RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ५]　　मंगळवार, जानेवारी ९, २०२४/पौष १९, शके १९४५　　[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई, ४०० ०३२, दिनांक ९ जानेवारी, २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक एफएलआर ०६२२/प्र.क्र.१५०/राउशु-२.— ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (२) च्या खंड (आय) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत प्राधिकृत इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :—

**१.** या नियमांना मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २०२४ असे संबोधण्यात यावे.

**२.** मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ (यापुढे यास "प्रधान नियम" असे संबोधावे) च्या नियम ४० मधील उप नियम (२) मध्ये, खंड (अ) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येत आहे, जसे की :—

"(अ १) - खंड (ब) च्या तरतुदींच्या अधीन राहून, परवानाधारक विक्रेता, परवाना देणाऱ्या मंजुरी प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने, मुंबई विदेशी मद्य (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ अंतर्गत विहित शुल्काचा भरणा केल्यावर, त्याचा अभिकर्ता असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी करार करून, परवाना अंतर्गत आपला व्यवसाय चालू ठेवू शकतो. असा करार राज्य सरकारने वेळोवेळी जारी केलेले नियम, विनियम, अटी, शर्ती, आदेश इत्यादींनुसार अनुज्ञप्तीधारकाच्या वतीने व्यवसाय करण्यासाठी असेल आणि तो अशा अभिकर्त्याला या परवान्याच्या भागीदाराचा किंवा परवानाधारकाचा कोणताही कायदेशीर दर्जा प्रदान करणार नाही.".

**३.** नमुना एफएल-२ मध्ये मुख्य नियमांना जोडलेले,—

(i) अट क्र. ६, "परवानाधारक" या शब्दांनंतर "आणि परवान्याचा अभिकर्ता, जर असेल तर" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत;

(ii) अट क्र. ७, "परवानाधारक" या शब्दांनंतर "आणि परवान्याचा अभिकर्ता, जर असेल तर" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 9th January, 2024.

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No. FLR-0622/C.R.150/EXC-2.— Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) (hereinafter referred to as "the said Act") ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(i)* of sub-section (*2*) read with proviso to sub-section (*3*) of section 143 of the said Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 2024.

2. In rule 40 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (2), after clause *(a)*, the following clause shall be inserted, namely :—

"*(al)* Subject to the provisions of clause *(b)*, a holder of vendor's license, may carry on his business under the license, by making an agreement with any person being his agent with the previous sanction of the licensing authority, on payment of fees prescribed under the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954. Such agreement shall be for conducting business on behalf of vendor as per rules, regulations, terms, conditions, orders, etc. issued by the State Government, from time to time and it shall not confer upon such agent any legal status of a partner or a licensee of the said license.".

3. In Form FL-II appended to the principal Rules,—

*(i)* in condition No. 6, after the words "the licensee" the words "and the agent of the said license, if any," shall be inserted;

*(ii)* in condition No. 7, after the words "the licensee" the words "and the agent of the said license, if any," shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.